# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## २६/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२८) इतिवृत्त

शुक्रवार, दिनांक २६/२/२०१० रोजी मा.सभापती **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ११.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म.), नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री.सतीश कटकटे
०२. श्री.रविकांत काशीनाथ गवळी
०३. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
०४. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०५. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०६. श्री.कचरू सोनवणे
०७. श्री.दामोधर माधवराव शिंदे

**संवाद :**

मा.सभापती : काल मा.आयुक्त यांचे पत्र प्राप्त झाले त्यांनी स्थायी समितीला विनंती केली की दिं.23-24/03/2010 स्थायी समितीची बैठक आयोजीत करावी. शासन निधी अंतर्गत अंतिम निविदा ज्या स्थायी समितीकडे सादर करावयाच्या आहेत, मा.आयुक्तांनी त्या सादर केल्या आहेत.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाकडून आलेले विषय सादर करण्यात यावे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी जे पत्र दिले त्याची माहिती नगरसचिव यांनी सभागृहाला द्यावी.

नगरसचिव : मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड प्रकरण खाली स्थायी समितीचे कामकाजाचे नियम 3 (क) अन्वये आयुक्ताच्या मते जे कोणतेही कामकाज स्थायी समितीच्या सभेत समितीच्या पुढील सर्वसाधारण सभेपर्यत लांबणीवर टाकता येणार नाही. असे कामकाज चालण्यासाठी आयुक्तांनी सही करून लेखी मागणी केल्यावर स्थायी समितीच्या अध्यक्षाने 24 तासाच्या आत उक्त समितीची विशेष बैठक बोलविली पाहिजे. अशी तरतूद आहे.

श्री.रविकांत गवळी : भंगार साहित्य निविदा पध्दतीने विक्री करणेसाठी निविदा मागविल्या होत्या यात महापालिकेने एक विशिष्ट दर ठरविलेले असतात नंतर निविदा धारक येतात.या कार्यवाहीच्या वेळी 02 स्थायी समितीच्या सदस्यांची निवड करण्यात आली होती. मागिल वेळेस मी येवू शकलो नाही कालही मला पत्र आले योगायोगाने तेथे होतो.यात 70 लक्ष प्रशासनाने दर निश्चित केले बोली धारकाने 72 लक्ष देण्याचे मान्य केले.परंतु एखादा बोलीधारक किंवा इतर

कुणी व्यक्ती 80-82 लक्ष मध्ये घेण्यास तयार असेल तर त्यांना देता येतो का ?

मा.सभापती : भंगार साहित्य संदर्भात 72 लक्षचा जो प्रस्ताव स्थायी समितीकडे प्रशासनाने पाठविला या साहित्याचे जर कुणी 80 लक्ष देण्यास तयार असेल व महापालिकेचा 8-10 लक्षचा फायदा होत असेल तर त्या व्यक्तीला निविदा देवू दिं.22 तारखेला एका व्यक्तीने या संदर्भात तक्रार केली.तो व्यक्ती 80 लक्षमध्ये सदर साहित्य घेण्यास तयार आहे. जर महापालिकेचा यात फायदा होत असेल तर त्यास निविदा देवू शकतो.

**विषय क्र. ४५३ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, दिनांक १९.२.२००९ रोजी अध्यक्ष, बळवंत ल. खांडेकर, गीता ज्ञानेश्वरी स्वाध्याय व सांस्कृतिक मंडळ, उस्मानपुरा, औरंगाबाद यांनी महानगरपालिकेच्या मालकीचे श्रेयनगर येथील सामाजिक सभागृह भाडेपट्ट्यावर मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे.

श्रेयनगर न.भु.क्र.१५९४९ येथील सामाजिक सभागृहाचे क्षेत्रफळ १०४ चौ.मी.असून सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती चौ.मी. प्रती माह रू.१०९/- भाडे आकारणे योग्य. मा.सर्वसाधारण सभेत सदरील सामाजिक सभागृह भाडेपट्ट्यावर देण्याबाबत मंजुरी मिळाल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह, अकृषी कर व इतर संलग्न कराचा भरणा करून घेवून करारनामा करून देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.नारायण कुचे : गीता ज्ञानेश्वरी स्वाध्याय व सांस्कृतिक मंडळ ही सामाजिक कार्य करणारी संस्था आहे. त्यामुळे नाममात्र भाडे आकारणी करण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : कमीत कमी भाडे आकारणी करण्यात यावी. मा.सर्वसाधारण सभेने रू.१०००/- भाडे दर ठरविलेला आहे.

मा.सभापती : सदरील संस्था ही सामाजिक कार्य करणारी संस्था असून सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार कमीत कमी भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गीता ज्ञानेश्वरी स्वाध्याय व सांस्कृतिक मंडळ, उस्मानपुरा, औरंगाबाद या संस्थेस महानगरपालिकेच्या मालकीचे श्रेयनगर येथील सामाजिक सभागृह कमीत कमी भाडे आकारणी करून मनपाच्या नेहमीच्या अटी-शर्तीनुसार भाडेपट्ट्यावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर येथील खुली जागा व हॉल श्री समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित अखील भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांनी भाडेतत्वावर मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

सदरील ठिकाणच्या हॉलचे क्षेत्रफळ ४१.७ चौ.मी. असून सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती चौ.मी. प्रती माह भाडे रू.२१०/- आकारणे योग्य. संबंधीतास सदरील हॉल भाडेपट्ट्याने देण्यास मान्यता मिळाल्यास संबंधीतांकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क व अकृषिक कराचा भरणा करून घेवून महानगरपालिकेच्या हक्कात भाडेपट्ट्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.रविकांत गवळी : भाडे तत्त्वावर देणे संदर्भात आहे मंजूर करावे मागिल 408 क्रमांकाचा ठराव स्थगित किंवा रद्य केला होता पुन्हा आलेला आहे.

मा.सभापती : हा विषय मंजूर करण्यात येतो विषय क्र.408 प्रशासनाने सदर ठराव देवून नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर येथील खुली जागा व हॉल श्री समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित अखील भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक या संस्थेस प्रती चौ.मी. प्रती माह भाडे रू.२१०/- आकारून व एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्केम सेवा शुल्क व अकृषिक कराचा भरणा करून घेवून सदरील हॉल भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : ऐनवेळचे प्रशासनाचे व स.सदस्याचे आलेले सर्व प्रस्ताव मंजूर करावे.

मा.सभापती : ऐनवेळी प्रशासनाकडील व स.सदस्यांचे आलेले सर्व प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ४५५ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.९० एकनाथनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९७,५७०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३०३ दिनांक ६.१.२०१० अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | ०.१२% कमी |
| २. | श्री.एम.ए.सिद्यीकी | ५.८६% जास्त |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.१२% कमी असे आहेत.

तरी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९० एकनाथनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा ०.१२% कमी दराची मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर येथील दशमेशनगर रेखांकनातील खुल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३,३६,६८०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.१४९ दि.३.११.२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील आठ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.म्हस्के साईनाथ सुखदेव | २५.००% कमी दर |
| २. | मे.इराम कन्स्ट्रक्शन | २०.५०% कमी दर |
| ३. | मे.तुषार कन्स्ट्रक्शन | २०.२१% कमी दर |
| ४. | मे.अरबाज कन्स्ट्रक्शन | ४०.०१% कमी दर |
| ५. | श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | ३९.९०% कमी दर |
| ६. | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | ३६.७७% कमी दर |
| ७. | श्री.सय्यद खुर्शीद हसन | २७.९९% कमी दर |
| ८. | श्री.अब्दुल कदीर शेख रहीम | २७.२०% कमी दर |

वरील प्राप्त निविदापैकी मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०.०१% कमी असे आहेत.

मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांना सदर कामाचे दरपृथःकरण सादर करणेस्तव कळविण्यात आले असता त्यांनी दर पृथःकरण सादर केलेले नाही. म्हणुन सदरील काम या कामासाठी प्राप्त दुसऱ्या क्रमांकाचे एजन्सीकडून म्हणजे श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांचेकडून प्रथम क्रमांकाचे दरात म्हणजे अं.प.दरापेक्षा ४०.०१% कमी दराने करून घेण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी सदरील काम श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०.०१% कमी दराने करून घेण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर येथील दशमेशनगर रेखांकनातील खुल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाचे दरात म्हणजेच अं.प.दरापेक्षा ४०.०१% कमी दरात श्री.प्रल्हाद सुरेश टेंभुर्णीकर यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या जुन्या मशिनरी व इतर साहित्य निर्लेखित करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार दि.२२/०२/२०१० रोजी मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे जाहीर लिलाव

करण्यात आला. जाहीर लिलावाची कार्यवाही मे.शंकर रामचंद्र ऑक्शनर्स, पुणे यांनी महानगरपालिकेच्या ऑक्शन कमिटीच्या खालील सदस्यासमक्ष पूर्ण केली.

०१. शहर अभियंता

०२. कार्यकारी अभियंता (ब व क)

०३. मुख्य लेखा परिक्षक

०४. मुख्यलेखाधिकारी

जाहीर लिलावामध्ये एकूण १३८ बोलीधारकांनी सहभाग घेतला. लॉट क्र.१२ व २३ चा इतर लॉटमध्ये समावेश केलेला असल्यामुळे सदरील लॉट निर्लेखन किंमत काढण्यायपूर्वीच वगळण्यात आलेला आहे. सुरूवातीस सोबतच्या यादीप्रमाणे लॉटनिहाय बोली पुकारण्यात आली असता एकाही लॉटकरीत बोलीधारकांनी बोली बोलली नाही. त्यामुळे लॉट क्र.९ व ३४ वगळून इतर सर्व लॉटकरीता एकत्रित बोली बोलण्याबाबत सर्वानुमते उठरले. त्यानुसार बोली पुकारण्यात आली असता सुरवातीस चार वेळेस बोलीतील किंमत ऑक्शन कमिटीने अमान्य केली. त्यामुळे पुन्हा बोली पुकारण्यात आली असता सर्वात जास्त बोली मे.माणिकचंद गणेशमल ॲण्ड कंपनी, पुणे यांनी बोललल्यामुळै बोलीतील किंमत रक्कम रू.७२,०१,०००/- सर्वानुमते स्विकारण्यात आली.

लॉट क्र.९ जुने जळालेले ऑईल विक्रीसाठी बोली पुकारण्यात आली असता सर्वात जास्त बोली मे.अमोल ऑईल, जळगांव यांनी रक्कम रूपये ४०,०००/- ची बोली बोलली. सरील किंमत कमिटीच्या सर्व सदस्यांनी सर्वानुमते स्विकारली आहे.

शेवटी लॉट क्र.३४ साठी बोली पुकारण्यात आली असता एकाही बोलीधारकाने बोली बोलली नाही.

जुन्या मशीनरी व इतर साहित्याच्या विक्रीसाठी झालेल्या जाहीर लिलावाचा संक्षिप्त तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | लॉट क्रमांक | बोली धारकाचे नांव | मनपाची निर्लेखित किंमत | जाहीर लिलावात प्राप्त किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, १०, ११, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३ ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८. | मे.माणिकचंद गणेशमल ॲंड कंपनी, पुणे. | ७०,०६,९७०/- | ७२,०१,०००/- |
| २. | ९ - जळालेले ऑईल | मे.अमोल ऑईल, जळगांव | ८४,०००/- | ४०,०००/- |
| | | एकुण किंमत - | ७०,९०,९७०/- | **७२,४१,०००/-** |

वरीलप्रमाणे विक्री करण्यात येणाऱ्या जुन्या साहित्याची महानगरपालिकेने निश्चित केलेली निर्लेखीत किंमत रूपये ७०,९०,९७०/- असून जाहीर लिलावात रक्कम रूपये ७२,४१,०००/- किंमत प्राप्त झाली आहे. जाहीर लिलावातील किंमत ही व्हॅट टॅक्स व इन्कम टॅक्स वगळून असून या

किंमतीवर बोलीधारकास योग्य तो व्हॅट टॅक्स व इन्कम टॅक्सचा भरणा करावा लागेल. जाहीर लिलावात प्राप्त झालेली एकूण किंमत ही निर्लेखीत एकुण किंमतीपेक्षा १,५०,०३०/- ने जास्त आहे.

तरी वरील प्रमाणे सर्वात जास्त बोली बोलणाऱ्या बोलीधारकास साहित्याची विक्री करणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या जुन्या मशिनरी व इतर साहित्य निर्लेखित करण्यासाठी ऑक्शन कमिटीच्या सदस्यांसमक्ष झालेल्या जाहीर लिलावानुसार सर्व लॉटकरीता एकत्रित बोली रक्कम रू.७२,०१,०००/- अशी सर्वात जास्त बोली मे.माणिकचंद गणेशमल ॲण्ड कंपनी, पुणे यांनी व लॉट क्र.९ जुने जळालेले ऑईल विक्रीसाठी रक्कम रूपये ४०,०००/- ची सर्वात जास्त बोली मे.अमोल ऑईल, जळगांव यांनी बोली बोलल्यानुसार जुन्या मशीनरी व इतर साहित्याच्या विक्रीसाठी खालील तपशीलाप्रमाणे संबंधीत बोलीधारकास साहित्याची विक्री करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. बोलीधारकास प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे योग्य तो व्हॅट टॅक्स, इन्कम टॅक्स इ. करांचा भरणा करावा लागेल.

| अ.क्र. | लॉट क्रमांक | बोली धारकाचे नांव | मनपाची निर्लेखित किंमत | जाहीर लिलावात प्राप्त किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, १०, ११, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३ ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८. | मे.माणिकचंद गणेशमल ॲंड कंपनी, पुणे. | ७०,०६,९७०/- | ७२,०१,०००/- |
| २. | ९ - जळालेले ऑईल | मे.अमोल ऑईल, जळगांव | ८४,०००/- | ४०,०००/- |
| | | एकुण किंमत - | ७०,९०,९७०/- | **७२,४१,०००/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८ :**

प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको येथील विविध १२ उद्यानात चौकीदाराकरीता निवासस्थान व नागरीकांसाठी स्वच्छतागृह बांधणे करीता सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुची सन २००९-१० नुसार रक्कम रू.१४,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००९-१० अंतर्गत नविन उद्याने या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१४,४०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको येथील विविध १२ उद्यानात चौकीदाराकरीता निवासस्थान व नागरीकांसाठी स्वच्छतागृह बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ऐतिहासिक जाफरगेट दरवाजाची जपवणूक करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २००७-०८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.१०,१९,०००/- च्या अंदाजपत्रकाच्या श्री.मुबारक महेबुब पठाण यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.३५% कमी दराच्या निविदेस मा.स्थायी समिती सभा दि.३१.३.०८ विषय क्र.४८४ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर काम मुळ अंदाजपत्रक र.रू.१०,१९,०००/- असुन या ठिकाणी आवश्यकतेनुसार कामे पूर्ण करण्यात आली आहेत. इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्टस् ॲन्ड कल्चरल हेरीटेज (इन्टॅक)च्या दृष्टीकोनातून ऐतिहासिक दरवाजाच्या बाजुने संरक्षित भिंत बांधणे, ग्रील लावणे व अँगलद्वारे दरवाजाचे मजबुतीकरण करणे आवश्यक असल्याने व सदर कामे करण्यासाठी मुळ अंदाजपत्रकात सदरील बाबींचा समावेश नसल्याने र.रू.८२,३००/- चे अतिरिक्त बाबींचे काम करावे लागणार आहे. इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्टस् ॲन्ड कल्चरल हेरीटेज (इन्टॅक) यांचे मार्फत अतिरिक्त बाबींसह सुधरीत अंदाजपत्रक रक्कम रू.१०,५९,७६०/- चे तयार करण्यात आले आहे. ज्यामध्ये वास्तुविशारद/संस्थेच्या फिसचा सुध्दा समावेश आहे. या बाब बदलामुळे व सुधारीत अंदाजपत्रकामुळे होणारा खर्च मुळ अंदाजपत्रकाच्या बचतीमधून करण्यात येणार आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१०,५९,७६०/- चे मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक जाफरगेट दरवाजाची जपवणूक करणेच्या कामामध्ये ऐतिहासिक दरवाजाच्या बाजुने संरक्षित भिंत बांधणे, ग्रील लावणे व अँगलद्वारे दरवाजाचे मजबुतीकरण करणे आवश्यक असल्याने र.रू.८२,३००/- चे अतिरिक्त बाबींचे काम करण्यास व रक्कम रू.१०,५९,७६०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.०१ हर्सुल अंतर्गत विविध गल्ल्यामध्ये डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९७,२६७/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पातील पान क्र. GBR-A-०४ अ.क्र.०१ वरील डांबरी रस्ते शहर, या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती दि.२२.१२.२००९ ठराव क्र.२५१ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा बोलविण्यात आल्या असता स्वीकृतीच्या अंतिम तारखेस एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ड्रीमलँड कन्स्ट्रक्शन | २४.२५% कमी दराने |
| २. | श्रीजीत एस. कवापुरांबील | १.७८% कमी दराने |
| ३. | श्री. एम.ए.सिद्यीकी | ०.५% जास्त दराने |

वरीलप्रमाणे सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा २४.२५% कमी दराची निविदा मे.ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन यांची असून त्यास मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

करीता मे.ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन यांची २४.२५% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०१ हर्सुल अंतर्गत विविध गल्ल्यामध्ये डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा २४.२५% कमी दराची मे. ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४६१ :</u>**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.६९ जवाहर कॉलनी अंतर्गत हेडगेवार रूग्णालय ते माणिक हॉस्पीटल रस्त्याचे मजबुतीकरण करणे व पुन:र्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,८८,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | २.४०% कमी दराने |
| २. | मे.मॉस्कोट कन्स्ट्रक्शन कंपनी | ८.८५% जास्त दराने |
| ३. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ९.००% जास्त दराने |
| ४. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | १५.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २.४०% कमी असे आहेत.

उपरोक्त दर जास्त वाटत असल्याने मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन हे सदर काम अं.प.दरापेक्षा २.४०% कमी ऐवजी ३.००% कमी दराने करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु मा.आयुक्त यांनी सदरील काम अं.प.दरापेक्षा ५.००% कमी दराने करून घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे अं.प.दरापेक्षा ५.००% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६९ जवाहर कॉलनी अंतर्गत हेडगेवार रूग्णालय ते माणिक हॉस्पीटल रस्त्याचे मजबुतीकरण करणे व पुन:र्डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा ५.००% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ऐतिहासिक कटकट गेट जतन व संवर्धन करण्यासाठी इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्टस् ॲन्ड कल्चरल हेरीटेज (इनटॅक) या संस्थेचे मार्गदर्शन घेण्यात येणार असून त्यांचे निगराणीखाली दरवाजाचे काम करण्यात येणार आहे. सदर काम नेहमीच्या बांधकामापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असुन संपुर्ण कामासाठी ट्रेडीशनल प्रकारची वाट, चुना, दगड हे साहित्य उपयोगात आणण्यात येणार असल्याने सदर कामाचे अंदाजपत्रक इनटॅक संस्थेच्या वास्तुविशारद यांचे कडून तपासुन घेण्यात आलेले आहे व सदर कामासाठी यापुढेही त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सदरील कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००८-२००९ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.३१,४२,४१३/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च ऐतिहासिक दरवाजे या लेखाशिर्षा मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा उघडण्यात आली असता त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

१. मे.गायत्री आर्किटेक्ट १७.००% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदा अं.प.दरापेक्षा १७% जास्त दराची मे.गायत्री आर्किटेक्ट यांची आहे. संबंधीत गुत्तेदार यांची १७% जास्त दराची निविदा प्राप्त असल्याने मा.आयुक्त यांनी संबंधीतास वाटाघाटीसाठी बोलाविले असता, संबंधीत निविदाधारकाने १५% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी मे.गायत्री आर्किटेक्ट यांची अं.प.दरापेक्षा १५% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव तसेच प्राप्त निविदा ही १५% जास्त दराची असल्याने रक्कम रू.३६,१३,७७५/- च्या खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक कटकट गेट जतन व संवर्धन करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.गायत्री आर्किटेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने करूस्न घेण्यास तसेच १५% जास्त दराची निविदा असल्याने रक्कम रू.३६,१३,७७५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ऐतिहासिक नौबत दरवाजा जतन व संवर्धन करण्यासाठी इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्टस् ॲन्ड कल्चरल हेरीटेज (इनटॅक) या संस्थेचे मार्गदर्शन घेण्यात येणार असून त्यांचे निगराणीखाली दरवाजाचे काम करण्यात येणार आहे. सदर काम नेहमीच्या बांधकामापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असुन संपुर्ण कामासाठी ट्रेडीशनल प्रकारची वाट, चुना, दगड हे साहित्य उपयोगात आणण्यात येणार असल्याने सदर कामाचे अंदाजपत्रक इनटॅक संस्थेच्या वास्तुविशारद यांचे कडून तपासुन घेण्यात आलेले आहे व सदर कामासाठी यापुढेही त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सदरील कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.४७,२१,७७५/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च ऐतिहासिक दरवाजे या लेखाशिर्षा मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा उघडण्यात आली असता त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

१. श्री.काझी मुबारीजोद्यीन बशीरोद्यीन १७.५१% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदा अं.प.दरापेक्षा १७.५१% जास्त दराची श्री.काझी मुबारीजोद्यीन बशीरोद्यीन यांची आहे. सदर निविदा सातव्या वेळेस काढण्यात आली असून यापूर्वी सदर कामासाठी प्रतिसाद मिळालेला नाही. संबंधीत गुत्तेदार यांची १७.५१% जास्त दराची निविदा प्राप्त असल्याने मा.आयुक्त यांनी संबंधीतास वाटाघाटीसाठी बोलाविले असता, संबंधीत निविदाधारकाने १५% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी श्री.काझी मुबारीजोद्यीन बशीरोद्यीन यांची अं.प.दरापेक्षा १५% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव तसेच प्राप्त निविदा ही १५% जास्त दराची असल्याने रक्कम रू.५४,३०,०४१/- च्या खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक नौबत दरवाजा जतन व संवर्धन करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम श्री.काझी मुबारीजोद्यीन बशीरोद्यीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने करूस्न घेण्यास तसेच १५% जास्त दराची निविदा असल्याने रक्कम रू.५४,३०,०४१/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान समोरील मुख्य रस्त्यावर उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ फुट ओव्हर ब्रिज बांधणेसाठी रक्कम रू.४० लक्ष ढोबळ अंदाजपत्रक तयार करून मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF) अंतर्गत निधी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासन निर्णय ग्राम व जलसंधारण विभाग क्रमांक बीआरजीएफ २००९/प्र.क्र.१३८/पंरा-६, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ नुसार या कामासाठी रू.३०.०० लक्ष तरतुद उपलब्ध झाली आहे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर अनुदानापैकी ५% निधी प्रकल्प व्यवस्थापन संबंधीत खर्च भागविण्यासाठी व उर्वरीत ९५% निधी विकास कामावरील खर्च भागविण्यासाठी करावयाचा आहे. उपलब्ध झालेल्या तरतुदीच्या मर्यादीत करावयाच्या कामाचे (टप्पा क्र.०१) रक्कम रू.३० लक्ष अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.८५० दि.२१.१२.२००९ अन्वये (टप्पा क्र.०१) चे रक्कम रू.३० लक्ष च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्तीनंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा बोलविण्यात आल्या असता स्विकृतीच्या अंतिम तारखेस श्री.मुबारक महेबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९९% जास्त दराची निविदा प्राप्त झाली आहे. परंतु अं.प.दरापेक्षा १५% जास्त दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

श्री.मुबारक पठाण यांनी १५% जास्त दरास संमती दर्शविल्यानुसार अं.प.दरापेक्षा १५% जास्त दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान समोरील मुख्य रस्त्यावर उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ फुट ओव्हर ब्रिज बांधणेसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रक (टप्पा क्र.०१) चे रक्कम रू.३० लक्ष च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार संबंधीत निविदाधारकांनी संमती दिल्याप्रमाणे सदरील काम श्री.मुबारक महेबुब पठाण यांचेकडून अं.प.दरापेक्षा १५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय जुनी इमारत (नगरपालिकेच्या काळातील) व प्रशासकीय इमारत टप्पा क्र.०३ यांना जोडणारा फुट ब्रिज (Sky Walk) बांधणेसाठी रक्कम रू.४० लक्ष ढोबळ अंदाजपत्रक तयार करून मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF) अंतर्गत निधी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासन निर्णय ग्राम व जलसंधारण विभाग क्रमांक बीआरजीएफ २००९/प्र.क्र.१३८/पंरा-६, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ नुसार या कामासाठी रू.३०.०० लक्ष तरतुद उपलब्ध झाली आहे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर अनुदानापैकी ५% निधी प्रकल्प व्यवस्थापन संबंधीत खर्च भागविण्यासाठी व उर्वरीत ९५% निधी विकास कामावरील खर्च भागविण्यासाठी करावयाचा आहे. उपलब्ध झालेल्या तरतुदीच्या मर्यादीत करावयाच्या कामाचे (टप्पा क्र.०१) रक्कम रू.३० लक्ष अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.८५३ दि.२१.१२.२००९ अन्वये हे काम करणेस आणि अंदाजपत्रक रक्कम रू.३० लक्ष ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा बोलविण्यात आल्या असता स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | मे.हायवे कन्स्ट्रक्शन | १३.१२% जास्त दराने |
| २. | श्री.मुबारक महेबुब पठाण | १४.९९% जास्त दराने |
| ३. | श्री.शेख मोहम्मद इब्राहिम | २५.७५% जास्त दराने |

वरीलप्रमाणे सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१२% जास्त दराची निविदा मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी १०% जास्त दरास मान्यता दिली आहे. करिता मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांचे १०% जास्त दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासकीय जुनी इमारत (नगरपालिकेच्या काळातील) व प्रशासकीय इमारत टप्पा क्र.०३ यांना जोडणारा फुट ब्रिज (Sky Walk) बांधणेसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रक (टप्पा क्र.०१) चे रक्कम रू.३० लक्ष च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार संबंधीत निविदाधारकांनी संमती दिल्याप्रमाणे सदरील काम मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा १०% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७६ जालना रस्ता ते संघर्षनगर या २४.०० मी. रूंद रस्त्याची विशेष दुरूस्ती करणेच्या कामाचे रक्कम रू.४४,८८,९००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७०७ दि.७.११.२००९ नुसार मंजुरीही मिळालेली आहे. सदर कामासाठीचा खर्च शहरी भागात पुनःर्डांबरीकरण करणे अंतर्गत करण्यात येणार असून यासाठी अर्थसंकल्प सन २००९-१० अंतर्गत तरतुद केलेली आहे.

सदर कामासाठी रितसर ई-निविदा मार्फत फेरनिविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दर भरून एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | ३.६६% कमी दराने |
| २. | राजेंद्रसिंग अजितसिंग | १.००% कमी दराने |
| ३. | आर. के. कन्स्ट्रक्शन | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा ३.६६% कमी दराची निविदा मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची असून मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७६ जालना रस्ता ते संघर्षनगर या २४.०० मी. रूंद रस्त्याची विशेष दुरूस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३.६६% कमी दराची मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४ अंतर्गत रेल्वेस्टेशन ओव्हरब्रीज खालील सर्व्हीस रोडची दुरूस्ती व डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.७५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीचया अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. गुरूनानक इंडस्ट्रीज | अं.प.दरापेक्षा ०.०५% कमी दराने |
| २. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ०.०७% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची अं.प.दरापेक्षा ०.०५% कमी दराची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरील निविदेस २% कमी दराने मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९४ अंतर्गत रेल्वेस्टेशन ओव्हरब्रीज खालील सर्व्हीस रोडची दुरूस्ती व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% (दोन टक्के) कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मागास क्षेत्र अनुदान निधी अंतर्गत अग्निशामक कार्यालय, पदमपुरा येथे ड्युटी इन्चार्ज करीता स्वतंत्र कक्ष उभारणे, शेड बांधणे व इतर किरकोळ कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.५९,९९,५००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. एकुण ४ निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन कंपनी | ८.४९% कमी दराने |
| २. | एल.के.कन्स्ट्रक्शन कंपनी | ६.७६% कमी दराने |
| ३. | एम. ए. सिद्यीकी | ३.७८६% कमी दराने |
| ४. | शेख मोहम्मद इब्राहिम | १५.७५% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकांपैकी ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ८.४९% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.४९% कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागास क्षेत्र अनुदान निधी अंतर्गत अग्निशामक कार्यालय, पदमपुरा येथे ड्युटी इन्चार्ज करीता स्वतंत्र कक्ष उभारणे, शेड बांधणे व इतर किरकोळ कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदेनुसार सदरील काम ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अं.प.दरापेक्षा ८.४९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६९ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र. ८३ पुंडलिकनगर येथील नाल्यामध्ये २५० मी.मी. व्यासाची आरसीसी व अंतर्गत भागामध्ये २०० मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे आणि ६०० मी.मी. व्यासाचे आरसीसी रोड क्रॉसींग पाईप टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.९,९९,३७४/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.२०.८.२००८ अन्वये मान्यता असून सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकच निविदा २४% जास्त दराने प्राप्त झाली होती. त्यामुळे सदर कामाच्या फेर बी-१ निविदा मागविल्या असता एकूण २ निविदा प्राप्त झाल्या. त्या दिनांक ११.१.२०१० रोजी उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. मे. शेख कन्स्ट्रक्शन | १४.७०% जास्त दराने |
| २. मे.पुजा कन्स्ट्रक्शन | कागदपत्रा अभावी रद्द |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १४.७०% जास्त दराची मे.शेख कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा.आयुक्तांनी दिनांक २२.२.२०१० रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७०% जास्त दराची मे.शेख कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ८३ पुंडलिकनगर येथील नाल्यामध्ये २५० मी.मी. व्यासाची आरसीसी व अंतर्गत भागामध्ये २०० मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे आणि ६०० मी.मी. व्यासाचे आरसीसी रोड क्रॉसींग पाईप टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.शेख कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर बायजीपुरा अंतर्गत महानगरपालिकेतर्फे बसैय्येनगर येथे व्यायामशाळा बांधलेली आहे. सदरील व्यायामशाळेचा वॉर्ड क्र. ५० व ५१ या वॉर्डातील युवकांना लाभ होणार आहे. "श्री छत्रपती शाहू महाराज क्रिडा मंडळ, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद" या संस्थेने सदरची व्यायामशाळा माफक दरात भाडेतत्वावर मिळण्याची विनंती केलेली आहे. मनपाच्या व्यायामशाळेची देखभाल व्यवस्थीतपणे व्हावी व व्यायामशाळा सुरळीतपणे चालावी याकरीता सदरची व्यायामशाळा श्री छत्रपती शाहू महाराज क्रिडा मंडळास भाडेतत्वावर दिल्यास इमारतीची देखभाल होईल व या परिसरातील युवकांना व्यायामशाळेचा लाभ घेता येईल. करीता बसैय्येनगर येथील व्यायामशाळा श्री छत्रपती शाहू महाराज क्रिडा मंडळास माफक दराने भाडे आकारून भाडेतत्वावर देण्यात यावी.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : प्रशांत देसरडा अनुमोदक : दामोधर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर बायजीपुरा अंतर्गत महानगरपालिकेतर्फे बसैय्येनगर येथील व्यायामशाळा "श्री छत्रपती शाहू महाराज क्रिडा मंडळ, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद" या संस्थेने विनंती केल्यानुसार, व्यायामशाळेची देखभाल व्हावी व परिसरातील युवकांना व्यायामशाळेचा लाभ मिळावा यासाठी बसैय्येनगर येथील व्यायामशाळा श्री छत्रपती शाहू महाराज क्रिडा मंडळास माफक दराने भाडे आकारून भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१ :**

श्री.बी.के.अभंग, कनिष्ठ अभियंता, वॉर्ड-क, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००५/१९३६, दि.२२/११/२००५ अन्वये "देय वार्षिक वेतनवाढ पुढील पाच वर्षासाठी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशी थांबविण्यात येते व भविष्यातील पदोन्नतीपासून ३ वर्षासाठी वंचित करण्यात येते" या शिक्षेविरूध्द केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.बी.के.अभंग, कनिष्ठ अभियंता, वॉर्ड-क, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००५/१९३६, दि.२२/११/२००५ विरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते. त्यांची देय वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करण्यास व पुढील पदोन्नतीसाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७२ :**

श्री.शाहीन अहेमद हसन अली, शिपाई, जायकवाडी पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी द्रव्यदंड रू.१०००/- माफ करणे व निलंबन काळ हा सेवाकाळ गृहीत धरण्याची विनंती केली असून कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-२/२०१०/१६५ दि.२५/२/२०१० अन्वये केलेल्या शिक्षेविरूध्दच्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-२/२०१०/१६५ दि.२५/२/२०१० विरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते. द्रव्यदंड

रू.१०००/- माफ करून निलंबन काळ हा सेवाकाळ गृहीत धरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३ :**

श्री.राहुल ए. पल्लेवार, क.लि., आरोग्य विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००६/२६, दि.६/१/२००७ अन्वये "निलंबन काळ कायमस्वरूपी निलंबन काळ गृहीत धरून दोन वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी थांबविण्यात आल्या व मुळ वेतनावर आणण्यात आले" या शिक्षेविरूध्द केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.राहुल ए. पल्लेवार, क.लि., आरोग्य विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००६/२६, दि.६/१/२००७ विरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते. त्यांना देय असलेली दोन वेतनवाढ पुर्ववत सुरू करण्यास व निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणून गृहीत धरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मागास क्षेत्र अनुदान निधी अंतर्गत कैलासनगर स्मशानभूमी येथे विविध विकास कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२९,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. एकुण ४ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | एल.के.कन्स्ट्रक्शन कंपनी | ५.२५% कमी दराने |
| २. | काझी मुबारीजोद्यीन बशीरोद्यीन | ३.६९% कमी दराने |
| ३. | रमेश बालकृष्ण रूडसमुद्र | तांत्रिकदृष्ट्या बाद |
| ४. | कासलीवाल कन्स्ट्रक्शन | तांत्रिकदृष्ट्या बाद |

वरील प्राप्त निविदा पत्रकांपैकी एल.के.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ५.२५% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी एल.के.कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.२५% कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागास क्षेत्र अनुदान निधी अंतर्गत कैलासनगर स्मशानभूमी येथे विविध विकास कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदेनुसार सदरील काम एल.के. कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अं.प.दरापेक्षा ५.२५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खुशबु, ग्रंथपाल व इतर ११ सोसायटी मधील पोच रस्त्याचे काम करणेच्या कामाचे अं.प.रक्क्म रू.३० लक्ष तयार करून मागास क्षेत्र अनुदान निधी (BRGF)

अंतर्गत निधी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासन निर्णय ग्राम व जलसंधारण विभाग क्रमांक बीआरजीएफ २००९/प्र.क्र.१३८/पंरा-६, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ नुसार या कामासाठी रू.२० लक्ष तरतुद उपलब्ध झाली आहे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर अनुदानापैकी ५% निधी प्रकल्प व्यवस्थापन संबंधीत खर्च भागविण्यासाठी व उर्वरीत ९५% निधी विकास कामावरील खर्च भागविण्यासाठी करावयाचा आहे. उपलब्ध झालेल्या तरतुदीच्या मर्यादेत करावयाच्या कामाचे अं.प.रक्कम रू.१९,९८,८१४/- सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास मा.आयुक्त महोदय यांची दिनांक २९/१२/२००९ रोजी मान्यता प्राप्त झाली त्यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.३२४, दिनांक २९/१/२०१० अन्वये अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा बोलाविण्यात आल्या असता स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | मे. अरोरा कन्स्ट्रक्शन | ०.१२% कमी दराने |
| २. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | ३% जास्त दराने |
| ३. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ३.५% जास्त दराने |

वरीलप्रमाणे सर्वात कमी म्हणजे अदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१२% कमी दराची निविदा मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची आहे. ०.१२% कमी दराऐवजी मा.आयुक्त यांनी ३% कमी दराने मान्यता दिली आहे. करीता मे.अरोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी स्विकृती दिल्यानुसार ३% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खुशबु, ग्रंथपाल व इतर ११ सोसायटी मधील पोच रस्त्याचे काम करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय इमारत टप्पा क्रमांक १, २ व ३ परिसराची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेसाठी र.रू.१५.०० लक्षच्या अंदाजपत्रकास विषय क्र.१४६, दिनांक ४.१२.२००८ नुसार मान्यता झाली आहे. त्यानंतर कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या असता मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची १२.५०% कमी दराच्या प्राप्त निविदेस मा.स्थायी समिती विषय क्रमांक २३० दिनांक २०.२.२००९ नुसार मंजुरीचा ठराव पारीत झाला. संबंधीत एजन्सीद्वारे प्रस्तुत काम प्रगतीपथावर असतांना मा.आयुक्त महोदय व मा.पदाधिकारी यांनी इमारत व परिसरातील कामांची वेळोवेळी पाहणी केली आणि मान्यवरांनी कंत्राटदारास इमारत दुरूस्ती, परिसर सुधारणा व सुशोभिकरण करणे संबंधीत परिशिष्ट-ब व्यतिरिक्त इतर विविध कामे करण्याचे सुचविले. त्यानुसार या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.३४,३१,७३८/- चे तयार करण्यात आले आहे. यापैकी रक्कम रू.२३,८७,३५५/- रक्कमेची कामे मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी पूर्ण केली आहेत आणि उर्वरीत र.रू.१०,४४,३८३/- ची कामे प्रगतीपथावर आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात र.रू.१५.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. वाढीव होणारा खर्च उपलब्ध करणेसाठी आणि सुधारीत अं.प.र.रू.३४,३१,७३८/- ला सक्षम प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता विषय क्र.८५६ दि.२१.१२.२००९ अन्वये प्राप्त झाली आहे.

सुधारीत अंदाजपत्रकातील मुळ परिशिष्ट-ब मधील वाढीव बाबींची परिमाणे मंजूर निविदा दरानुसार आणि मुळ कामातील परिशिष्ट-ब मध्ये समाविष्ट नसलेल्या अतिरिक्त बाबी अंदाजपत्रक दरानुसार कंत्राटदार मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांना अदा करण्याचे मा.पदाधिकारी आणि मा.आयुक्त महोदय यांचे कामाच्या ठिकाणी संयुक्त पाहणीत ठरल्यानुसार मुळ कामाच्या परिशिष्ट-ब मधील काही बाबी आणि अतिरिक्त काही बाबी देयक रक्कम रू.१४,८४,०२०/- कंत्राटदार यांना अदा करण्यात आले आहे. वरील प्रमाणे तयार करण्यात आलेले सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू. ३४,३१,७३८/- मधून झालेले आणि प्रगतीपथावरील कामाचे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी मंजूर निविदा दराप्रमाणे आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने मे.इरम कन्स्ट्रक्शन कं. यांचेकडून करणेस मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारत टप्पा क्रमांक १, २ व ३ परिसराची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेच्या कामामध्ये काही अतिरिक्त बाबींमुळे वाढीव काम सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू. ३४,३१,७३८/- मधून झालेले आणि प्रगतीपथावरील कामाचे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी मंजूर निविदा दराप्रमाणे आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने मे.इरम कन्स्ट्रक्शन कं. यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद